| जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय नांदेड | |
| --- | --- |
| वेब साईट - www.nanded.gov.in | E-mail- nandedrdc@ gmil.com |
| Phone ०२४६२-२३५०७७ | Fax No- ०२४६२-२३८५०० शाखा - महसूल १ |
| क्र.२०२०/आरबी-१/डेस्क-२/टे-४/सिआर- | दिनांक १५.०३.२०२० |

प्रति,

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, नांदेड
२) कुलसचिव, स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
३) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, किनवट
४) सहसंचालक, उच्च शिक्षण अनुदान, नांदेड
५) प्राचार्य/संचालक, सर्व शासकीय, अनुदानित, विनाअनुदानित, पदवी, पदवित्तर संस्था (मार्फत सहसंचालक, उच्च शिक्षण अनुदान, नांदेड)
६) प्राचार्य औद्योगिक प्रशिक्षण संस्था शासकीय/निमशासकीय जि.नांदेड
७) शिक्षणाधिकारी (माध्यमिक/प्राथमिक), नांदेड

**विषयः**- राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजना करण्याबाबत. (शहरी हद्दी लगतच्या शैक्षणिक संस्था बंद ठेवणेबाबत).

**संदर्भः**-१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांचे पत्र क्र.कोरोना/२०२०/प्रक्र.५८/आरोग्य-५ दि.१४.०३.२०२०.
२) साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ चे खंड २,३ व ४
३) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र. करोना २०२०/प्रक्र.५८/आरोग्य -५ दि.१४ मार्च,२०२०
४) या कार्यालयाचे समक्रमांकीत पत्र दिनांक १५.०३.२०२०.
५) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांचे पत्र क्र.कोरोना/२०२०/प्रक्र.५८/आरोग्य-५ दि.१५.०३.२०२०.

विषयांकीत प्रकरणात या कार्यालयाचे संदर्भीय पत्र क्र.४ नुसार नांदेड जिल्हयातील महानगरपालिका व सर्व नगरपालिका, सर्व नगरपंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी व खाजगी शाळा तसेच महाविद्यालये व व्यवसाय व प्रशिक्षण केंद्रे यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था, साथरोग प्रतिबंध कायदा १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसुचना व नियमावली मधील तरतुदीनुसार दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत निर्देश दिले आहेत.

Scanned by CamScanner

तथापि संदर्भीय पत्र क्र.०५ नुसार राज्यात ब-याच प्रमाणात मोठया शैक्षणिक संस्था हया महानगरपालिका, नगरपालिका व नगरपंचायतीच्या क्षेत्राच्या परिघाबाहेर ग्रामीण क्षेत्रात मोडतात परंतु या संस्था नागरी क्षेत्राला लागून आहेत. तसेच, मोठया शैक्षणिक संस्थामध्ये निवारी विद्यार्थी वस्तीगृहे ही आहेत. त्याच बरोबर या शैक्षणिक संस्थामध्ये दैनंदिन स्वरुपात शहरी व ग्रामीण भागातुन विद्यार्थी येत जात असल्याने या ठिकाणी कोविड विषाणूचा प्रार्दुभाव होण्याची दाट शक्यता असल्याने अशा महानगरपालिका, नगरपालिका व नगरपंचायतीच्या क्षेत्रालगतच्या जवळपास असलेल्या अशा मोठया शैक्षणिक संस्था दि.३१ मार्च,२०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत निर्देश आहेत.

त्यानुसार मी नांदेड जिल्हयातील महानगरपालिका, सर्व नगरपालिका व सर्व नगरपंचायतीच्या क्षेत्रालगतच्या जवळपास असलेल्या अशा मोठया शैक्षणिक संस्था दि.३१ मार्च,२०२० पर्यंत बंद ठेवण्याचे निर्देश देत आहे.

तसेच, सदर ठिकाणी इयत्ता १० वी व १२ वी च्या परिक्षा तसेच विद्यापीठाचे प्रात्यक्षिके व परीक्षा विहीत वेळा पत्रकानुसार घेण्यात यावे असेही निर्देश आहेत त्याच प्रमाणे आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाही यासाठी आवश्यकती दक्षता व खबरदारी घेण्याच्या सुचना देखील आहेत.

वरील प्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास वेळोवेळी सादर करावा. सदर कामाच्या अंमलबजावणीत अधिकारी/कर्मचारी यांचेकडून हलगर्जीपणा निदर्शनास आल्यास संबंधितांविरुध्द कार्यवाही करुन/कार्यवाहीचा प्रस्ताव या कार्यालयास सादर करावा.

(डॉ. विपीन इटनकर) भा.प्र.से.
**जिल्हादंडाधिकारी, नांदेड**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई.
२) मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद

**प्रतिलीपी, माहिती व कार्यवाहीस्तव**

३) पोलीस अधीक्षक, नांदेड
४) जिल्हा शल्य चिकीत्सक, नांदेड.
५) सर्व उपविभागीय दंडाधिकारी, नांदेड जिल्हा
६) सर्व तालूका दंडाधिकारी, नांदेड जिल्हा

**जिल्हादंडाधिकारी, नांदेड**

Scanned by CamScanner